# सायबर सेल, पिंपरी चिंचवड

**पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,**
**प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे**

| प्रेसनोट | पिंपरी चिंचवड | दिनांक - ३१/०८/२०२४ |
|---|---|---|

## शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे बहाण्याने ऑनलाईन ४०,९५,०००/- रुपयांची फसवणुक करणारे संशयीतास सायबर सेलकडुन ताब्यात घेवुन गुन्हा उघड

इंद्रायणी पार्क, मोशी येथे राहणा-या महीला तक्रारदार यांचे फेसबुकवर आरोपी यांनी फिडिलेटी कंपनीची जाहीरात पाठवुन त्यांना लिंकद्वारे व्हॉट्सअप ग्रुपवर जॉईन केले व त्यांचे कंपनीचे ॲपवरुन तसेच त्यांचे सल्ल्याप्रमाणे शेअर्स टेड्रींग केल्यास चांगला लाभ मिळवुन देण्याचे अमीष दाखवुन तक्रारदार यांचा विश्वास संपादन करुन वेगवेगळे कंपनीचे शेअर ट्रेडींगसाठी वेगवेगळया बँक अकाऊंटवर रक्कम भरण्यास सांगितले व त्यांचे ॲपवर भरलेल्या रक्कमेवर चांगला फायदा दाखवुन तक्रारदार महीलेस एकुण ४०,९५,०००/- रु. भरण्यास भाग पाडले, तक्रारदार यांनी त्यांनी भरलेल्या रक्कमेवर सदर ॲपवर दिसत असलेल्या फायदयामधील रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता त्यांना ती रक्कम काढता येत नसल्याचे व ॲपवर दिसणारी रक्कम फसवी असल्याचे लक्षात आल्याने त्यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आले त्यावेळी तक्रारदार महीलेने प्रथम ऑनलाईन तक्रार केली व त्यानंतर दिघी पोलीस ठाण्यास सदरबाबत तक्रार दिल्याने दिघी पो.स्टे. गु.रजि.नं. ३४७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत) कायदा २००८ चे कलम ६६ (सी) ६६ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा वरिष्ठांचे आदेशाने सायबर सेलकडुन समांतर तपास चालु असताना आरोपी याने गुन्हा करण्यासाठी वेगवेगळया बँक अकाऊंटचा वापर केला असल्याने सदर बँक अकाऊंटची माहीती घेतली असता त्यामधील संशयीत आय.डी.एफ.सी. बँक अकाऊंट नंबर ६३५००६९३८२६ धारकाबाबत खात्रीशीर तांत्रिक माहीती प्राप्त करुन मा. वरिष्ठांचे परवानगीने पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे, सहा. पोलीस निरीक्षक, प्रविण स्वामी यांनी सायबर सेलकडील पोलीस उप निरीक्षक रविंद्र पन्हाळे, पोलीस अंमलदार कृष्णा गवळी, हेमंत खरात असे पथक मिळालेल्या तांत्रिक माहीतीवरुन सदर संशयीत बँक अकाऊंटधारकाचा शोध व तपास करणेकामी पाठविले असता सदर पथकाने संशयीत बँक अकाऊंट धारक **कुमेर नखद दान वय २४ वर्षे, रा. राजस्थान** याचा शोध घेवुन त्यास सायबर सेल येथे आणुन त्याचेकडे तपास करता त्याने सदर गुन्हा त्याचे राजस्थान येथील साथीदाराबरोबर करीत असल्याची कबुली दिली त्याचा दाखल गुन्हयात सक्रिय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास दाखल गुन्हयाचे पुढील कारवाईकरीता एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे. त्याचे इतर साथीदार, फसवणुकीचे रक्कमेबाबतचा तपास चालु आहे. आरोपी यांनी गुन्हा करण्यासाठी वापरलेले नमुद बँक अकाऊंटवर एकुण १५ पोर्टलच्या तक्रारी व त्यामध्ये ०४ कोटी रुपयांपेक्षा जास्त व्यवहार झाल्याचे आढळुन आले आहे, त्याअनुषंगाने तपास चालु असुन सबंधीतांना त्याबाबत माहीती देण्यात येत आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड - श्री.विनयकुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त- श्री. डॉ. शशिकांत महावरकर, मा. अपर पोलीस आयुक्त- श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे - श्री. संदिप डोईफोडे, मा. सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १ - श्री. डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. रविकिरण नाळे, सपोनि. प्रविण स्वामी, पोउपनि सागर पोमण, पोउपनि. रविंद्र पन्हाळे, पोलीस अंमलदार कृष्णा गवळी, हेमंत खरात, नितेश बिचेवार, विशाल निश्चीत, सुरंजन चव्हाण सर्व नेमणुक सायबर सेल यांच्या पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,
पिंपरी चिंचवड.